## <u>कलम ४(१) (१) (ब) (xvii)</u>

उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग पुणे या कार्यालयातील प्रकाशित माहिती सामाजिक वनीकरण यंत्रणेमार्फत अंमलबजावणी होत असलेल्या कार्यक्रम योजनांची माहिती.

केंद्र शासनाच्या माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत कलम ४ (१) ब (i) सामाजिक वनीकरण विभागाचे संघटन,कार्य व कर्तव्य :

राष्ट्रीय कृषि आयोगाने १९७३ चे अंतरीम व १९७६ चे अंतिम अहवालात सामाजिक वनीकरण विभाग राज्यात स्थापन्याची संकल्पना मांडली होती. त्यानुसार राज्यपातळीवर घडामोडी होऊन सन १९८१-८२ मध्ये सामाजिक वनीकरण विभागाची महाराष्ट्र राज्यात निर्मिती झाली. सद्यस्थितीत सामाजिक वनीकरण विभाग, जलसंधारण विभागाचा एक भाग आहे. जलसंधारण मंत्रालय सामाजिक वनीकरण विभागावर नियंत्रण करीत असते. संचालक, सामाजिक वनीकरण हे खात्याचे प्रमुख असून त्यांच्या अधिनस्त सहा सहसंचालक, महसूली विभाग मुख्यालयात कार्यरत आहेत. त्यापैकी पुण येथे असलेले सहसंचालक, सामाजिक वनीकरण वृत्त, पुणे यांचे अंतर्गत सामाजिक वनीकरण विभाग पुणे कार्यरत आहे. उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग पुणे हे जिल्हास्तरीय प्रमुख असून त्यांचे कार्यक्षेत्र पुणे जिल्हा आहे. सामाजिक वनीकरण पुणे मध्ये २ सहाय्यक संचालक हे उपसंचालकांना सहाय्यक म्हणून त्यांच्या कार्यालयात काम करीत असतात. उपसंचालक कार्यालयाचा पत्ता खालीलप्रमाणे आहे.

उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग,पुणे.
चिपळूणकर भवन पहिला मजला,
लाल बहादूर शास्त्री मार्ग, पुणे ४११ ०३०

**१. जिल्हास्तरीय योजना -**

१.१ **महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना -** राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा,२००५ अंतर्गत महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेची व्यापक प्रसिध्दी करण्यांबाबत महाराष्ट्र शासन नियोजन विभाग मंत्रालय, मुंबई ३२ अन्वये शासन निर्णय क्रमांक मग्रारोहयो २००८/प्रक्र २४/रोहयो/१/दि.१३ फेब्रुवारी २००८ नुसार राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा २००५ अंतर्गत महाराष्ट्र राज्यात पहिल्या टप्प्यात २ फेब्रुवारी २००६ पासून १२ जिल्हयामध्ये दि.१ एप्रिल २००८ पासून महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना या नांवाने योजना राबविण्यांत येत आहे. या योजनेमध्ये लोक सहभाग,पारदर्शकता,सामाजिक अंकेक्षण,ग्रामसेवकाला काम निवडणेचे अधिकार व ग्रामपंचायतीला अंमलबजावणीचे अधिकार देण्यात आलेले आहेत. या योजनेची योग्य पध्दतीने अंमलबजावणी करण्यांकरीता मोठया प्रमाणात ग्रामस्तरावर प्रशिक्षण देण्यात आले आहे व सुरू आहे.

## २.राज्यस्तरीय योजना

### २.१ रोपेनिर्मिती

**२.१ अ मध्यवर्ती रोपमळे -** सामाजिक वनीकरण यंत्रणेच्या वेगवेगळया उपक्रमांतर्गत लागवडीसाठी आवश्यक रोपांची गरज भागविण्यासाठी वनमहोत्सव तसेच खाजगी लागवडीकरीता लोकांना स्वयंसेवी संस्था,शाळा,कॉलेजस् आणि सामाजिक संघटना यांना सवलतीच्या दराने रोपांचा पुरवठा करण्याकरीता विविध वृक्ष प्रजाती व शोभिवंत रोपांची निर्मिती केली जाते. रोपे विक्रीचे सवलतीचे दर शासनाकडून दरवर्षी मंजूर करण्यांत येतात.

**२.१ ब वनमहोत्सव रोपवाटिका -** वरिलप्रमाणे रोपे निर्मिती केली जाते. दि. ५ जून ते ३० ऑगस्ट हा कालावधी वनमहोत्सव कालावधी म्हणून साजरा करतात. या काळात मान्सून सर्कीय असल्यामुळे लोकांना वृक्ष लागवडीसाठी सवलतीच्या दराने रोपांचा पुरवठा केला जातो.

**२.१ क किसान रोपवाटिका योजना -** ही योजना राज्यात सन १९८६-८७ पासून केंद्र शासनाच्या आर्थिक सहाय्यातून राबविण्यात आली. सन १९९२-९३ पासून ही योजना राज्य शासनाक डे हस्तांतरीत झाली. या योजनेमध्ये काही बदल करून सुधारीत किसान रोपवाटिका योजना १९९३-९४ पासून राज्य शासनाच्या निधीमधून राबविण्यांत येत आहे.

या योजनेची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

१. रोपेनिर्मितीचे तंत्रज्ञान जनतेपर्यंत पोहोचविणे.
२. अनुभवी लाभार्थींना खाजगी रोपवाटिकेचा पुरक व्यवसाय उपलब्ध करून देऊन त्याद्वारे त्यांची आर्थिक पातळी उंचावण्यास मदत करणे.
३. शासकीय/निम शासकीय विभागासाठी रोपे उपलब्ध करून देणे.
४. वृक्ष लागवडीसाठी स्थानिक पातळीवर रोपे उपलब्ध करून देणे.
५. रोपे निर्मिती व वृक्ष लागवडीचे कामामध्ये जनतेचा जास्तीत जास्त सहभाग मिळविणे.

या योजनेसाठी लाथ्भार्थींची निवड संबधित जिल्हयाचे उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग यांचेकडून संबधित तालुक्याचे लागवड अधिकारी यांचेमार्फत प्रामुख्याने लहान व सिमांतिक शेतक-यामधून करण्यांत येते. या लहान व सिमांतिक शेतक-यांकडून योग्य प्रतिसाद न मिळाल्यास या योजनेचा लाभ देण्यांत येतो. महिला मंडळे, अशासकीय संस्था,अपंगासाठी काम करणा-या संस्था इत्यादिंची सुध्दा लाभधारक म्हणून निवड करण्यांत येते.

रोपे निर्मितीसाठी विभागाकडून खालीलप्रमाणे अर्थसहाय्य दिले जाते.

| | | |
|---|---|---|
| अ. | साहित्यरूपाने | (अग्रीम) |
| | १० x २० सेंमी. आकाराच्या पॉलीथीन पिशवीच्या किंमतीपोटी | ०.३० पैसे प्रती रोप |
| | बी-बियाणे,रासायनिक खते व किटकनाशके यावरील खर्चापोटी | ०.०७ पैसे प्रती रोप |
| ब. | रोख रकमेच्या स्वरूपात मजूरीसाठी अग्रीम | ०.५८ प्रती रोप |
| | एकूण - | ०.९५ प्रती रोप |

यापैकी लाभधारकाने करारनामा केल्यावर ०.३७ पैसे प्रती रोप अग्रीम हा पॉलीथीन पिशव्या, बी-बियाणे,खते व किटकनाशकांचे स्वरूपांत दिला जातो व त्यानंतर बी पेरणेचे काम पुर्ण झाल्याची खात्री झाल्यावर मजूरी पोटी अग्रीम ०.५८ पैसे प्रती रोप रोखीच्या स्वरूपांत दिला जातो. लाभार्थीकडे स्वतःची किमान २ आर/२ गुंठे जमिन हवी. जमिन निवास स्थानापासून जवळ असावी. बारमाही वहातूक व्यवस्था उपलब्ध असावी. पाणी पुरवठयाची पुरेशी सोय असावी. लाथ्भार्थीने तयार केलल्या रोपांपेकी अग्रीमापोटी ५० टक्के रोपे सामाजिक वनीकरण विभागाकडून घेतली जातात. उर्वरीत रोपांची विक्री लाभार्थी त्यांचे मर्जीनुसार हव्या त्या दराने करू शकतो.

उदा.१०,००० रोपे निर्मितीसाठी सामाजिक वनीकरण विभागाकडून अर्थसहाय्य रू. ०.९५ प्र.रोप प्रमाण एकूण रू. ९५००/- चे अर्थसहाय्य जे तयार होणा-या रोपांच्या स्वरूपांत किंवा रोखीने वसूल पात्र आहेत. रोपांची किंमत रू.२.८४ प्र.रोप आहे.

याप्रमाणे १०,००० रोपे तयार झाल्यास @ २.८४ प्रमाणे रू. २८४००/- ची रोपे तयार झाली. सा.व. ५० टक्के रोपे परत घेणार ती ५००० रोपे खालीलप्रमाणे.

५००० रोपांची किंमत @ २.८४ प्रमाणे रू.१४२००/-

दिलेला वसुल पात्र अग्रीम रू.९५००/-

लाभार्थीस देय रक्कम रू. ४७००/-

१. रू. ९५००/- मध्ये @ २.८४ प्र.रोप प्रमाणे ३३४५ रोपे येतात.

२. रू. ४७००/- मध्ये @ २.८४ प्र.रोप प्रमाणे १६५५ रोपे येतात.

एकूण - १४२००/- ५००० रोपे.

रोपांचा विनीयोग - सदरची रोपे जून महिन्यात १ ते १/५ फूट उंचीची लागवड योग्य असावीत. सामाजिक वनीकरणाने ही रोपे लाभार्थींच्या जागेवरच शासकीय दराने विक्री करावीत अथवा रोपवनात परस्पर लावावीत.

किसान लाभार्थीकडून रोपे शासकीय नर्सरीत आणणे अभिप्रेत नाही. त्याकरीता रोपे वहातुकीस निधी नाही.

## २.२ रोपे लागवड

## २.२ अ निवडलेल्या पानवहाळ क्षेत्रातील सामुहिक जमिनीवर वृक्ष लागवड

सन १९९२.९३ साली जलसंधारण विभागाची निर्मिती झाल्यावर सामाजिक वनीकरण संचालनालय जलसंधारण विभागाशी संलग्न करण्यांत आले. जलसंधारण विभागाच्या तत्कालीन ठरलेल्या धोरणानुसार फक्त निवडक पानवहाळ क्षेत्रातील गांव हे नियोजनाचा घटक मानून त्या गांवातील लघुपाणलोट निश्चित करून योग्य भूमि उपयोगितेच्या मृद संधारणाच्या व जलस्त्रोत बळकटीकरणाच्या कामाचे एकात्मिकरित्या नियोजन करून पडीक जमिन विकास कार्यक्रम कार्यान्वित करावयाचे ठरले. या योजनेअंतर्गत वनेतर सामुहिक जमिनी सोबतचे खाजगी क्षेत्रावर करावयाचे उपचार सुध्दा समाविष्ट आहेत.

या योजनेची प्रमुख वैशिष्ठये खालीलप्रमाणे आहेत.

सामुहिक जमिनीवर करण्यांत येणा-या लागवडीचा नमुना या लागवडीमध्ये लावण्यांत येणा-या वृक्ष प्रजाती तथा इतर अनुषंगीक बाबींची माहिती ग्रामसभेमध्ये गांवक-यांना विस्तृतपणे देण्यांत येते व ग्रामस्थांच्या मागणी व सल्ल्यानुसार लागवड व्यवस्थापन आराखडा तयार करण्यांत येतो.

१. सामुहिक जमिनीवर वृक्षलागवड केलेल्या क्षेत्राच्या संवर्धनाची, देखरेखीची व संरक्षणाची जबाबदारी ग्रामपंचायतीकडे सोपविली जाते. प्रत्यक्ष क्षेत्रीय कामे सुरू करण्याअगोदर याबाबत ग्रामपंचायतीने ठरावाद्वारे हमी देणे आवश्यक आहे.
२. रोपवन आराखडयाच्या तांत्रिक बाबींची माहिती ग्रामस्थाना देण्यांत येते.
३. या रोपवनापासून भविष्यकाळात मिळणा-या मध्यकालीन व अंतिम उत्पादनापासून प्राप्त होण्यास संपुर्ण निधी ग्रामपंचायतीने गावाच्या विकासासाठी किंवा दुर्बल घटकांचया विकासासाठी वापरावयाची मुभा आहे.
४. सिल्व्हि-हॉर्टीपाश्चर असे या योजनेचे लागवडीचे स्वरूप आहे. एकूण ९०० रोपे/हेक्टर लावली जातात. त्यापैकी ५० टक्के रोपे कोरडवाहू फळझाडांची लावावयाची असतात. त्यामध्ये बोर,सिताफळ,आवळा,चिंच,जांभूळ,वि.चिंच,हिरडा,बेहडा इ.रोपांच्या प्रजाती लावाव्यात. गवत लागवड स्थानिक व सुधारीत गवतांचे ठोंब/बी पेरून करावी. हे गवत जनावरांना खाण्याचे योग्यतेचे व सकस असावे.

## २.३ प्रशिक्षण कार्यक्रम

सामाजिक वनीकरण विभागातील कर्मचारी व नागरीकांना प्रशिक्षण देऊन त्याद्वारे जनजागृती घडविण्याच्या दृष्टीकोनातून सन ९२.९३ या वर्शापासून सामाजिक वनीकरण विभागामार्फत अधिकारी,कर्मचारी,स्वयंसेवी संस्था आाणि जनतेला प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रम राबविण्याकरीता जनतेला उद्युक्त करणे हा मुख्य हेतू आहे. सामाजिक वनीकरणाच्या विविध योजना लोकांपर्यंत पोहोचवाव्यात. या योजना

राबविणेसाठी समाजात प्रभावीपणे कार्य करू शकणा-या घटकांना याबाबत माहिती व्हावी व लाभार्थींना योजना राबविण्यासाठी आवश्यक तंत्रज्ञान उपलब्ध करून घ्यावे या हेतूने प्रशिक्षण कार्यक्रमाची आंखणी करण्यात आलेली आहे. लोकप्रतिनिधी,स्वंयसेवी संस्था,पुरसे्रा विजेते यांचा सामाजिक वनीकरणाच्या योजना जनतेपर्यंत पोहोचविण्यास उपयोग होतो यादृष्टीने अशा व्यक्तिंचे तालुका,वृत्त व राज्यस्तरावर कार्यशाळा,पेशिक्षण शिबीरे इ. ्द्वारा प्रबोधन करण्यांत येते. किसान रोपवाटिका व वनीकरण योजनांचे वैयक्तिक लाभार्थींना योजना जेथे चांगल्या प्रकारे राबविण्यांत आली आहे अशा ठिकाणी एकत्र करून त्यांना योजना राबविण्यास प्रोत्साहीत करण्यांत येते व योजनेचे तंत्र समजाऊन देण्यांत येते.

दरवर्षी उपसंचालक,सहाय्यक संचालक,लागवड अधिकारी,सहाय्यक लागवड अधिकारी,लागवड कोतवाल,लेखापाल,लिपिक व सामाजिक वनीकरण मजूर या अधिकारी व कर्मचारी यांना रोपवाटिका तंत्र, जुने रोपवन व्यवस्थापन प्रचार व प्रसिध्दी रेनवॉटर हार्वेस्टींग न्यायालयीन प्रकरणे सामुहिक सुसज्जता व औषधी वनस्पती आदी विषयांची उजळणी प्रशिक्षणे दिली जातात.

## २.४ प्रचार व प्रसिध्दी कार्यक्रम

सामाजिक वनीकरण विभागामार्फत वृक्ष लागवड मृद व जलसंवर्धनाच्या जनहिताच्या अनेक योजना राबविल्या जातात. या योजना लोकांचे सहकार्य घेऊन त्यांना योजना राबविण्यासाठी प्रवृत्त करून लोकसहभागाने राबविल्या जातात.सामाजिक वनीकरणाच्या या विविध योजनांची माहिती जनतेस होऊन लोकांना या योजनामध्ये सहभागी होण्यास प्रवृत्त करण्याचे,वृक्ष लागवड व वृक्षसंवर्धन याबाबत विविध माध्यमाद्वारे जनजागृती करून लोकांचे त्यासाठी पुर्ण सहकार्य मिळविण्याचे उद्देशाने विविध माध्यमाद्वारे प्रचार व प्रसिध्दीचे काम केले जाते. सामाजिक वनीकरण विभागामार्फत प्रचार व प्रसिध्दीचे कार्यक्रमांतर्गत करण्यांत येणा-या कामाचा थोडक्यांत तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

## २.४- अ विद्यालयीन माध्यमाद्वारे प्रसिध्दी

१. जिल्हास्तरावर निबंध,चित्रकला व वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन.

या स्पर्धासाठी महाविद्यालयीन ( इयत्ता ११ वी व पुढे ) विद्यालयीन (इयत्ता ७ वी ते १० वी ) व प्राथमिक विद्यालयीन ( इयत्ता ४ ते ७ वी ) असे तीन गट असून असे तीन गट असून प्रत्येक स्तरावर स्पर्धा आयोजित करून सामाजिक वनीकरण विभागामार्फत विद्यार्थ्यांमध्ये वृक्ष संवर्धन,वनीकरण,पडीक जमिन विकास,पर्यावरण संतुलन,मृद व जलसंधारण या विषयाबाबत जागृती केली जाते. विद्यालयीन व महाविद्यालयीन गटासाठी निंबध,चित्रकला व वक्तृत्व या स्पर्धा तर प्राथमिक विद्यालयीन गटासाठी फक्त चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यांत येते.

**२.४- ब बहिशाल प्रसिध्दी**

१. ग्रामसभांचे आयोजन
२. जिल्हास्तरावर खुली छायाचित्र स्पर्धा आयोजन.
३. कृषि प्रदर्शनामध्ये सहभाग
४. स्लाईडचे संच,लॅमिनेटेड फोटो व ट्रान्सलाईटस् स्लाईडस्द्वारे प्रदर्शनाचे आयोजन

**२.४-क मुद्रण माध्यमाद्वारे प्रसिध्दी**

१. घडीपत्रिका,स्टीकर्स, भिंतीपत्रिका यांचे विवरण
२. दिनदर्शिकांचे वितरण
३. यशोगाथा,स्मरणिका,योजनांची पुस्तिका,राज्यस्तरीस विजेत्या निंबधांचा समावेश असणारी निबंध पुस्तिका व वनश्री पुरस्काराबाबत घडीपत्रिकांचे वितरण.

**२.४-ड इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे प्रसिध्दी**

१. ध्वनी चित्रफितीची निर्मिती व प्रसारण
२. आकाशवाणी,दुरदर्शन इत्यादीवरून जाहिरातींचे (जिंगल्स) प्रसारण
३. आकाशवाणी व दुरदर्शन वरून वेळोवेळी तज्ञांच्या भाषणांचे/मुलाखतींचे प्रसारण याशिवाय सामाजिक वनीकरणांचे क्षेत्रात वैशिष्ठयपुर्ण काम करणा-या व्यक्ती व संस्था यांना महाराष्ट्र राज्य वनश्री पुरस्कार व केंद्र शासनातर्फे इंदिरा प्रियदर्शनी वृक्षमित्र पुरस्कार दिला जातो या पुरस्काराविषयीचा प्रस्ताव सामाजिक वनीकरण विभागामार्फत वरिष्ठांकडे सादर केले जातात.

**२.५ पुरस्कार योजना**
**२.५. १ वनश्री पुरस्कार**

सामाजिक वनीकरण हा आज एक आवश्यक आणि उपयुक्त उपक्रम झालेला आहे. सामाजिक वनीकरणाच्या प्रयत्नांना अधिक गती मिळावी त्यांत जनतेचा उस्फुर्त सहभाग वाढावा आणि ती एक लोकांची चळवळ व्हावी यासाठी वनीकरणाच्या क्षेत्रात उत्कृष्ठ कामगिरी करणा-या व्यक्ति व संस्थांना केंद्र शासनातर्फे इंदिरा प्रियदर्शनी वृक्षमित्र हा राष्ट्रीय पुरस्कार देऊन गौरविण्यांत येत असते याच धर्तीवर राज्यपातळीवर सुध्दा वनीकरणाच्या क्षेत्रात उत्कृष्ठ कार्य करणा-या व्यक्ति व संस्थाना महाराष्ट्र राज्य वनश्री पुरस्कार देऊन गौरविण्यांत येते. सामान्य जनतेंमध्ये वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन याबाबत आस्था निर्माण व्हावी आणि चांगल्या कार्याचा गौरव व्हावा हा त्यामागील उद्देश आहे.

**पुरस्काराचे स्वरूप :**

व्यक्ति ग्रामपंचायत,शैक्षणिक संस्था,सेवाभावी संस्था व गट विभाग /जिल्हा या पांच संवर्गात वपश्री पुरस्कार देण्यांत येतो. गट,विभाग,जिल्हा या संवर्गामध्ये सरकारी,निमसरकारी कार्यालयाचा समावेश होतो. राज्स्तरीय प्रत्येक संवर्गासाठी प्रथम,द्वितीय व तृतीय अशी तीन पारीतोषिके दिली जातात. प्रथम पुरस्कार रू.५००००/- चा असून द्वितीय आणि तृतीय पुरस्कार अनुक्रमे रू.४००००/- व रू.३००००/- चे आहेत याशिवाय वृत्तस्तरीय दोन पारितोषिकेही दिली जातात. प्रथम पुरस्कार रू.२५०००/- व द्वितीय पुरस्कार रू.१५०००/- आहे.पुरस्काराची रक्कम राट्रीय बचत पत्राच्या स्वरूपांत दिली जाते. शिवाय प्रत्येक विजेत्याला मानचिन्ह व प्रशस्तिपत्रक देऊन गौरविण्यांत येते तसेच पुरस्कार प्राप्त व्यक्ति आणि संस्था यांना पुरस्कार स्विकारण्यासाठी येण्या-जाण्याच्या खर्चासाठी रू. ५००/- देण्यांत येतात.

**पुरस्कारासाठी  निवडीचे निकष**

ज्या व्यक्त्‍ी आणि संस्था कमीत कमी तीन वर्ष वृक्षारोपन आणि वृक्षसंवर्धन क्षेत्रात कार्य करीत असतील त्यांनाच पुरस्कारासाटी योग्य मानण्यात येते. राज्य किंवा राष्ट्रीय स्तरावर सामाजिक वनीकरणाच्या क्षेत्रात पुरस्कार प्राप्त केलेली व्यक्ती किंवा  संस्था या पुरस्कारासाठी अपात्र समजण्यात येतात. शासकीय /निमशासकीय अधिकारी /कर्मचारी यांना योजनेत सहभाग घेता येत नाही.

**पुरस्कारासाठी अर्ज :**

दरवर्षी साधारणपणे १६ जानेवारी पर्यत सामाजिक वनीकरण विभागातर्फे प्रस्ताव मागविले  जातात. वनश्री पुरस्कारासाठी अर्ज विहित प्रपत्रात करावयाचा असतो. या प्रपत्राचा नमूना या कार्यालयातून प्राप्त करावा. व्यक्ती किंवा संस्थेच्या कार्याची माहिती देताना मागच्या तीन वर्षात त्यांनी स्वत:च्या आणिइतरांच्या पडीत जमिनीवर किती वृक्ष लागवड केली ? जिवंत झाडांची टक्क्‍ेवारी रोपवाटिका केली असेल तर किती रोपे तयार केली ? वनीकरणाचे माध्यमातून शाळकरी विद्यार्थी तथा महिला यांच्या कल्याणार्थ केलेले कार्य समाजातील दुर्बल घटकांच्या आर्थीक उन्नतीसाठी केलेले कार्य, अनुंसुचित जाती जमाती यांचे उन्नतीसाठी केलेले कार्य, सामुहिक लागवडीचे कुंपनाविना स्वयंस्फुतीने संरक्षण व देखरेखीचे केलेले काम, वनीकरणाच्या संदर्भात जनजागृती व प्रसिध्दी / प्रेरणा याबाबत केलेले कार्य या संबंधी सविस्तर माहिती / आकडेवारी देणे आवश्यक आहे.

प्रस्तावासोबत व्यक्ती व संस्थेने केलेल्या वनीकरणाची छायाचित्रे,मान्यवरांची प्रशस्तीपत्रके त्यांच्या कामाविषयीची काही प्रकाशने प्रसिध्द झाली असल्यास त्यांच्या प्रती अशा कामांसाठी पूर्वी काही पारितोषिके, पुरस्कार मिळाला असल्यास त्यांच्या प्रती जोडाव्यात.

**अर्ज सादर करण्याची मुदत :**

प्रत्येक वर्षाच्या ३१ डिसेंबर अखेरपयर्तच्या कार्याच्या आधारे १६ जानेवारी पर्यत विहित प्रस्ताव संबंधित जिल्हयाचे उपसंचालक सामाजिक वनीकरण विभाग यांचेकडे सादर करावा.

**महाराष्ट्र राज्य वनश्री पुरस्कारासाठी माहिती पत्राचा नमुना**

१. नोंदणी क्रमांक
१ अ नांव व पत्ता
असल्यास दुरध्वनी क्रमांक
खालील बाबतीत व्यक्ती / संस्था यांनी केलेल्या कार्याचा तपशिल
२. लोका्मार्फत सामाजिक वनीकरणाच्या कामासाठी रोपवाटिका स्थापन करणे / जनतेला उद्युक्त करणे .
३. शासकीय / सामुहिक अथवा खाजगी जमिनीवर सरपण / वैरण देणा-या झाडांची लागवड .
४. वृक्षलागवडीच्या कार्यक्रमांत ग्रामीण दुर्बल घटकांचा तसेंच महिलांचा सहभाग व त्यायोगे ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये सुधार.
५. वनीकरणाच्या माध्यमातून शाळकरी विद्यार्थी तथा महिला यांचे कल्याणार्थ केलेले कार्य
६. सामुहिक लागवडीचे कुंप्रनाविना स्वयंस्फुतीने संरक्षण व देखभाल
७. अपारंपारिक उर्जा स्त्रोताचा वापर करणेसाठी जनतेला प्रोत्साहित करणे व त्यांच्या वापरासाठी प्रवृत्त करण्याचे केलेले कार्य.
८. वनीकरणाच्या संबंधात जनजागृती /प्रसिध्दी व प्रेरणा याबाबतचे कार्य
९. केलेल्या कार्याचा कालावधी व लागवडीविषयी जिवंत झाडांच्या टक्केवारीसह सद्यस्थिती.
१०. केलेल्या कार्याविषयी काही प्रकाशने प्रसिध्द झाली असल्यास त्याच्या प्रती
११. अथ्रवा अशा कामांसाठी पुर्वी काही पारितोषिके, पुरस्कार , प्रशस्तीपत्रके इ.असल्यास त्यांचा तपशिल.
१२. अर्ज अग्रेषित करणा-या उपसंचालकांचा शेरा / शिफारस .
१३. सहसंचालकांची शिफारस.(मुख्यालयासाठी)

**३.केद्रशासनाच्या योजना :**

**३.१ राष्ट्रीय हरित सेना .**

सन २००६ पासून केद्र शासनाच्या पर्यावरण विभागामार्फत राष्ट्रीय हरित सेना योजना सुरु करण्यात आली .

या योजनेची उद्यिष्ठे माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांच्या वि।द्यार्थ्यामार्फत जनसामान्यामध्ये पर्यावरण विषयक जनजागृती करणे .

पुणे जिल्हयात २५० शाळांमध्ये राष्ट्रीय हरित सेना कार्यक्रम राबविला जातो. त्यांना दरवर्षी रु.२५००/- एवढे अनुदान वर्षभरामध्ये कार्यक्रम राबविणेसाठी दिले जाते.सरासरी ५० विद्यार्थी/ विद्यार्थ्यीनी प्रति शाळा राष्ट्रीय हरित सेनेच्या इको क्लबचे मेंबर आहेत. हे विद्यार्थी पर्यावरण सैनिक आहेत.

राष्ट्रीय हरित सेना योजनेअंतर्गत वितरित करण्यात येणा-या अनुदानातून विविध फलक तयार करुन आपल्या शाळेत लावण्यात यावेत जेणेकरुन इतर वि।द्यार्थ्यांग्ना राष्ट्रीय हरित सेनेबददल माहिती मिळेल.तसेंच या योजनेअंतर्गत वार्षिक दिनदर्शिकेमध्ये दर्शविलेप्रमाणे विविध दिन साजरे करावेत. जसे

| | | |
|---|---|---|
| जानेवारी ०९ | : | २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त राष्ट्रीय सनांच्या दिवशी राष्ट्रीय हरित सेना विद्यार्थ्याचे संचलन करावे. |
| फेब्रुवारी ०९ | : | २ फेब्रुवारी जागतिक आर्द्र भुमि दिवस |
| मार्च ०९ | : | इको फेंडली होळी - नैसर्गिक रंग तयार करणे.<br>२१ मार्च जागतिक वनदिन, २२ मार्च जागतिक जलदिन |
| एप्रिल ०९ | : | गुढीपाडवा - कडुलिंब रोपांची लागवड<br>२२ एप्रिल जागतिक वसुंधरा दिन |
| मे ०९ | : | उन्हाळयाच्या सुटटीत विविध जातीच्या वृक्षाचे बियाणे गोळा करणे |
| जून ०९ | : | ५ जुन जागतिक पर्यावरण दिन, वटपौर्णिमेनिमित्त वड रोपे लागवड, वृक्षारोपन. |
| जुलै ०९ | : | नागपंचमी - अंध श्रध्दा निर्मुलन जनजागृती |
| ऑगस्ट ०९ | : | रक्षाबंधनानिमित्त वृक्षरुपी भावाला राखी बांधणे,स्वातंत्र्यदिन<br>श्री गणेश उत्सवापूर्वी पर्यावरण पूर्वक मातीचे गणपती बनविणे. |
| सप्टेबर ०९ | : | अनंत चर्तुदशी - निर्मालय एकत्रित करुन जल प्रदुषण टाळावे.या करिता इको क्लबच्या विद्यार्थ्याच्या माध्यमातून जनजागृती करणेबाबत राष्ट्रीय हरित सेना या उपक्रमात उत्कृष्ट कार्य केल्याबददल शिक्षकांचा सत्कार<br>२२ सप्टे्बर जागतिक वाहन मुक्त्ी दिन साजरा करणे . |
| ऑक्टोबर ०९ | : | दिवाळी पूर्वी व दिवाळीत फटाक्यांचा वापर वाजविणेबाबत जागृती, तसेंच तुळशीच्या लग्नानिमित्त तुळस रोपे तयार करणे. |
| नोव्हेबर ०९ | : | १४ नोव्हेबर बालदिन साजरा करणे. |
| डिसेंबर ०९ | : | २ डिसेंबर राष्ट्रीय प्रदुषण नियंत्रण दिवस.<br>राष्ट्रीय हरित सेनेच्या विद्यार्थ्याना हवेतील प्रदुषण कसे मोजतात ते दाखविणे. |

### ३.२ एकात्मिक पडीक जमिन विकास कार्यक्रम -

केद्रपुरस्कृत एकात्मिक पडीक जमिन विकास कार्यक्रम वेल्हा तालूक्यातील निवडलेल्या गावात सन २००१.०२ पासून राबविण्यात येत आहे. प्रकल्पाचे एकूण भौगोलिक क्षेत्र ६४२८ हेक्टर आहे. प्रकल्पाचा कालावधी सन २००१.०२ ते २००५.०६ असा ५ वर्षाचा आहे. प्रकल्पाचे अंदाजित मुल्य रुपयें ३८५.६८ लक्ष इतके आहे.

उपरोक्त  १६ गांवामध्ये प्रकल्प राबविणेकतिरा प्रकल्प कार्यान्वयन अभिकरण (एक) म्हणून १० गांवाकरिता एक उपसंचालक,सामाजिक वनीकरण विभाग,पुणे व ६ गावाकरिता उपविभागीय वन अधिकारी, उपवन विभाग,भोर हे आहेत. मंजूर प्रकल्प आराखडयानुसार कामे प्रगतीपथावर आहेत.

**केद्रपुरस्कृत एकात्मिक पडीक जमिन विकास कार्यक्रम प्रकल्प ता.वेल्हा जि.पुणे**

| | | |
|---|---|---|
| १. प्रकल्पाचे नांव | - | एकात्मिक पडिक जमिन विकास कार्यक्रम. |
| २. प्रकल्पाचे ठिकाण | - | ता.वेल्हा, जि.पुणे. |
| ३. पाणवहाळ क्रमांक | - | बीएम५६ (भाग)व बीएम ५७(भाग) |
| ४. प्रकल्प मंजुरी क्र. व दिनांक | - | केंद्रशासनाचे पत्र क्र.के ११०११/३६/२००१/ डी (२) दि.२०.मार्च २००२. |
| ५. प्रकल्पाचा कालावधी | - | २००१ ते २००६ |
| ६. प्रकल्पाचे भौगोलिक क्षेत्र | - | ६४२८ हेक्टर |
| ७. प्रकल्पाचे अंदाजित मूल्य | - | रु.३८५.६८ लक्ष. |
| ८. प्रकल्पात समाविष्ट गांवे | - | १६ गांवे |

वरील १६ गांवामध्ये प्रकल्प राबविणेकरिता प्रकल्प कार्यान्वयन अभिकरण (एक) म्हणून १० गांवाकरिता १) उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग,पुणे व ६ गांवाकरिता २)उपविभागीय वन अधिकारी , उपवन विभाग भोर हे आहेत. त्यांची विभागणी खालीलप्रमाणे आहे.

प्रकल्प कार्यान्वयन अभिकरण (PIA १)

| अ.क्र. | गावाचे नांव | पाणवहाळ क्र . | भौ.क्षेत्र(हे) |
|---|---|---|---|
| १. | निगडे बु. | बीएम-५७ | ४५१ |
| २. | मांगदरी | बीएम-५७ | २४५ |
| ३. | केतकावणे | बीएम-५७ | ३०० |
| ४. | अडवली | बीएम-५७ | २९२ |
| ५. | चिचले बु. | बीएम-५७ | १०७ |
| ६. | आंबवणे | बीएम-५७ | २३० |
| ७. | वांगणीची वाडी | बीएम-५७ | ६१ |
| ८. | बोरावले | बीएम-५७ | ४१३ |
| ९. | करंजावणे | बीएम-५७ | २८६ |
| १०. | वांगणी | बीएम-५७ | ९६६ |
| | एकूण क्षेत्र | .. | ३३५१ हेक्टर |

प्रकल्प कार्यान्वयन अभिकरण ( PIA २ )

| अ.क्र. | गावाचे नांव | पाणवहाळ क्र . | भौ.क्षेत्र(हे) |
|---|---|---|---|
| ११. | खांबवडी | बीएम-५७ | २४४ |
| १२ | आसकवडी | बीएम-५७ | १३३ |
| १३ | मार्गासनी | बीएम-५७ | ४१० |
| १४ | कोळवडी | बीएम-५७ | ६०१ |
| १५ | विझर | बीएम-५६ | १४३७ |
| १६ | कातवडी | बीएम-५७ | २५२ |
| | एकूण क्षेत्र | .. | ३०७७ हेक्टर. |

---

एकूण एकंदर क्षेत्र हेक्टर ६४२८

---

| प्रकल्प कार्यान्वयन अभिकरण | प्राप्त अनुदान | खर्च रुपये लाख ( माहे मार्च २००९ अखेर ) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | गांवप्रवेश कामे | क्षेत्रिय कामे | प्रशिक्षण | स्वयं सहायता बचत गट (बिजभांडवल) | प्रशासकीय खर्च | एकूण |
| उपसंचालक,सामाजिक वनीकरण विभाग, पुणे | १५३.१९ | ५.५४ | ९१.३६ | ८.०८ | ५.२० | १०.२१ | १२०.३९ |

### ३.३ एकात्मिक पडीक जमिन विकास कार्यक्रम-वेल्हा-२

**<u>हरियाली मार्गदर्शक सुचनांतर्गत</u>**

प्रकल्प मंजुरी - केद्रशासन पत्र क्र.एसन./२७३/२००५.०६दि.१९.७.२००५

प्र.का.अभिकरण - उपसंचालक,सामाजिक वनीकरण विभाग,पुणे

प्र.का.अभिकरण मान्यता - अ.प्र.क्षे.का.अर्थ /०४.०५/दि.४.१.२००६

गावांची संख्या - ८ गांवे

पाणलोट क्रमांक - बीएम-५६

| अ.क्र. | गावाचे नांव | क्षेत्र (हे.) | अ.क्र. | गावाचे नांव | क्षेत्र (हे.) |
|---|---|---|---|---|---|
| १. | विहिर | २८१.०० | ५. | धानेप | ७७१.०० |
| २. | अंत्रोली | १०८९.०० | ६. | पाबे | ११७८.०० |
| ३. | दापोडे | ७९९.०० | ७. | लाशिरगांव | ४२८.०० |
| ४. | हिरपोडी | १७८.०० | ८. | मळवली | २८३.०० |

| प्रकल्प कार्यान्वयन अभिकरण | प्राप्त अनुदान | खर्च रुपये लाख ( माहे २००९ अखेर ) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | गांवप्रवेश कामे | प्रशिक्षण | सामुहिक संघटन | प्रशासकीय खर्च | एकूण |
| उपसंचालक,सामाजिक वनीकरण विभाग, पुणे | ४५.०० | ३८.११ | १.९५ | १.९९ | २.१५ | ४४.२० |

### ३.४ अवर्षण प्रवण क्षेत्र कार्यक्रम (हरियाली)

## हरियाली प्रकल्पांतर्गत पाणलोट विकासाची कामे

**सन २००५.०६ मध्ये प्रकल्प संचालक , जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,पुणे**

पाणलोट विकास समितीच्या सभेत हरियाली प्रकल्पांतर्गत पाणलोट विकासाची कामे करणेसाठी पुरंदर व इंदापूर तालुंक्यातील मिळून खालीलप्रमाणे एकूण २४ पाणलोटांची निवड करण्यात आली आहेत.

| तालुका | पाणलोटाचे /गावाचे नांव | क्षेत्र (हे.) | तालुका | पाणलोटाचे /गावाचे नांव | क्षेत्र (हे.) |
|---|---|---|---|---|---|
| इंदापूर | १. बळपुडी | ३०९.४९ | पुरंदर | १ पौंढे | ४०९.३२ |
| | २. बिजवडी | ७३७.८७ | | २. टेकवडी | ५९७.५४ |
| | ३. गोखळी | ५८७.०१ | | ३.राजूरी | ५८८.१७ |
| | ४. झगडेवाडी | ६६४.०० | | ४.रिसे | ५१०.०४ |
| | ५. पोंदकुलवाडी-१ | ५२१.२६ | | ५.पिसे | ४९८.०० |
| | ६. गागरगांव | ५०३.०८ | | ६.पौंढे २ | ६९२.८२ |
| | ७. बळपुडी-गांगरगाव | ५३२.७६ | | ७.टेकवडी-२ | ६५६.५४ |
| | ८.गोखळी-२ | ४६६.२२ | | ८.राजूरी-२ | ६७२.४६ |
| | ९.पोंदकुलवाडी -२ | २८८.०५ | | ९.राजूरी-३ | ६०१.७९ |
| | १०.वरकुटे बु.१ | ५२६.९४ | | १०.राजूरी-४ | ३२१.६९ |
| | ११.वरकुटे बु.२ | ४८०.८१ | | ११.रिसे-२ | ३९४.९० |
| | १२.वरकुटे बु.३ | ८३३.६३ | | १२.माळशिरस | ५७४.०० |
| | एकूण | ६४५१.४२ | | | ६५१७.२७ |

| तपशिल | कामे संख्या | प्राप्त निधी (रु.लाख) | झालेला खर्च(रु.लाख) |
|---|---|---|---|
| बॅच क्र.२ | ११ पाणलोट | १४०.७६ | ५४.२५ |
| बॅच क्र.३ | १३ पाणलोट | १४४.२० | ६८.१२ |
| एकूण | २४ पाणलोट | २८४.९६ | १२२.३७ |

### ३.५ पश्चिम घाट विकास कार्यक्रम

या योजनांतर्गत १.खाजगी जमिनीवर पथदर्शक वृक्षलागवड
२.शेतीच्या बांधावरील वृक्षलागवड

पश्चिम घाट विकास कार्यक्रमांतर्गत खाजगी जमिनीवर पथदर्शक वृक्षलागवड योजना राबविण्याची प्रमूख उद्यिष्ठे या प्रमाणे आहेत.

१. पश्चिम घाट क्षेत्रातील नैसर्गिक वैशिष्टे जतन करुन पर्यावरण परिस्थितीत समतोल राखणे .

२. या क्षेत्रातील अनुषंगिक विविधता जतन करणे
३. मानवी कृतिमुळे पर्यावरण परिस्थितीस पोहोचलेली हानी दूर करुन पर्यावरण पुर्ववत करणे.
४. पर्यावरणाच्या हानीमुळे होणा-या संभाव्य परिणामांची लोकांना जाणीव करुन देणे आणि त्याबाबत त्यांना शिक्षण देणे, पर्यावरणविषयक कार्यक्रमांन्वये त्याचा भाग मिळविणे. या योजनांतर्गत शेताच्या बांधावर साग,बांबु, शिवण, खैर,बाभुळ,हादगा,शेवगा,काजू,सिताफळ आणि जांभूळ या प्रजातींची लागवड करण्यात येते. ६००रोपे लागवडीकरीता एक मानीव हेक्टर धरण्यात येतो. सामुहिक जमिनीवर लागवडीचा कार्यक्रमही राबविण्यात येत असून या कार्यक्रमात प्रति हेक्टरी ९०० रोपे लागवड करुन नालांबाध बंदिस्तीची कामे करण्यात येतात. खाजगी पडीक जमिनीवर गट लागवडीचा कार्यक्रमही राबविण्यात येतो. प्रति हेक्टरी १६०० रोपे सलग समतल चरात लावण्यात येतात.

## ३.६ इंदिरा प्रियदर्शनी वृक्ष मित्र पुरस्कार

वृक्षारोपण व पडीक जमिन विकासासंबधी उत्कृष्ट कार्य करुन इतरांसमोर आदर्श निर्माण करणा-या संस्था तथा व्यक्तींना राष्ट्रीय पडीत जमिन विकास बोर्ड, पर्यावरण व वन मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या वतीने इंदिरा प्रियदर्शनी वृक्षमित्र पुरस्कार देवून गौरविण्यात येते. १९८६ पासून हे पुरस्कार देण्यात येतात. सन २००१ पर्यत महाराष्ट्रातील ३१ व्यक्ती /संस्था यांना हा पुरस्कार प्राप्त झाला आहे.

पुरस्कारासाठी खालीलप्रमाणे १० संवर्ग करण्यात आलेले आहेत.
अ. व्यक्ती
ब. पंचायत/ग्रामसभा/ग्रामपातळीवरील संस्था/ग्रामवन संरक्षण कमिटी/ग्राम पातळीवरील सहकारी संस्था.
क. स्वयंसेवी संस्था (महिला मंडळे तरुण मंडळासहित)
ड. जनजागृतीसाठी झटणा-या महिला संस्था
इ. शासकीय कर्मचारी (व्यक्ती)
ई. शैक्षणिक संस्था.
उ. शासकीय यंत्रणा (जिल्हास्तरापर्यतच्या)
ऊ. कार्पोरेट सेक्टर (खाजगी /सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्या)
ए. नगरपालिका /महानगरपालिका /लष्करी छावण्या
एं. राज्य शासनाच्या दर्जाच्या संस्था.

पुरस्काराची रक्कम - वरील प्रत्येक संवर्गासाठी १,००,०००/-रुपयांचा एक पुरस्कार, याशिवाय पदक व प्रशस्तीपत्रक.

नामांकन प्राप्तीचा अंतिम दिनांक - सर्वसाधारणपणे दिनांक ३१ मे पर्यत .

# <u>सामाजिक वनीकरण विभाग पुणे</u>
## राष्ट्रीय बांबू अभियान
## <u>वार्षिक कृति आराखडा सन २००९.१०</u>

**प्रस्तावना**

वनक्षेत्र व वनेत्तर क्षेत्रावर लागवड होणा-या बांबूच्या सर्वकष विकासाकरिता केद्रशासनाने राष्ट्रीय बांबू अभियान जाहीर केली आहे. या अभियानाची अंमलबजावणी १०० टक्के केन्द्रपुरस्कृत योजना म्हणून करण्यात येत आहे. राज्यात राष्ट्रीय बांबू अभियानाची अंमलबजावणी केन्द्रशासनाने निर्गमित केलेल्या दिनांक १४ डिसेंबर २००६ च्या मार्गदर्शक सुचनानुसार सुरु आहे.

**उद्दिष्टे**

१. बांबू क्षेत्राची वाढ व विकास या करिता क्षेत्रनिहाय तंत्रज्ञान बाबींची वाढ करणे
२. योग्य प्रजाती निवडून त्याव्दारे बांबूचे उत्पादन वाढविणे.
३. बांबूपासून निर्माण होणा-या उपजांचे विपणन करणेसाठी बाजारपेठेचा विकास करणे
४. लागवडदार, संग्राहक आणि व्यापारी यांचा समन्वय साधणे.
५. बांबूची वाढ व विकास या क्षेत्रातील पारंपारिक ज्ञान व अद्यावत तंत्रज्ञान यांचा समन्वय साधणे.
६. कुशल व अकुशल क्षेत्रातील युवकांना रोजगार निर्माण करणे.

**धोरण**

१. उत्पादकांना कायमस्वरुपी जास्तीत जास्त कायमस्वरुपी वित्तीय लाभ मिळवून देणे
२. बांबूचे सुधारित वाणांहा विकास करणे.
३. क्षेत्रनिहाय सुयोग्य प्रजाती व तंत्राचा अवलंब करणे.
४. व्यापारी व बांबूशी संबंधित खाजगी / सामुहिक संस्था यांना एकत्र आणण्याकरिता समन्वयकांची भूमिका बजावणे.
५. बांबू उत्पादन करणा-या शेतक-यास सहाय करण्यास सहकारी संस्था व स्वयंसहायता गट यांना उद्युक्त करणे.
६. मानव संसाधन विकास याकरिता प्रयत्न करणे.
७. बांबू उत्पादक व व्यापारी यांचा थेट समन्वय घडवून आणणे.

**जिल्हास्तरीय बांबू विकास यंत्रणेची स्थापना.**

राष्ट्रीय बांबू अभियानाची अंमलबजावणी जिल्हास्तरावर करण्याकरिता बांबू विकास यंत्रणेची स्थापना करण्यात आली असून जिल्हाधिकारी या समितीचे प्रमूख आहेत. बांबूचे उद्दिष्ट व धोरण यानुसार प्रस्ताव तयार करुन बांबू विकास यंत्रणेकडे सादर करणे व इतर योजनांशी समन्वय ठेवणे असे जिल्हास्तरीय बांबू विकास यंत्रणे्चे कार्य आहे.

## राष्ट्रीय बांबू अभियान
## वार्षिक कृती आराखडा

| अ.क्र | तपशिल | भौतिक | आर्थिक रू. लाखात |
|---|---|---|---|
| १ | मध्यवर्ती रोपवाटिका (०.२५ हे.)<br>५०,००० रोपे प्रति वर्ष प्रति घटक,रू.२.७३ लक्ष प्रति घटक | १ घटक= तालुका<br>१० घटक | २७.३० |
| २ | किसान रोपवाटिका (०.१० हेक्टर)<br>१०,००० रोपे प्रति वर्ष,प्रति घटक<br>रू.६५००/- प्रति घटक (२५ % ) म्हणजेच ०.६५ पैसे प्र.रोप या हिशोबाने अर्थ सहाय्य राहील. | १० घटक | ०.६५ |
| ३ | महिला रोपवाटिका (०.१० हे.)<br>५००० रोपे प्रति वर्ष,प्रति घटक रू.६५००/- प्रति घटक (२५ % ) म्हणजेच ०.६५ पैसे प्र.रोप या हिशोबाने अर्थ सहाय्य राहील. | १० घटक | ०.६५ |
| ४ | वनेतर खाजगी क्षेत्रात रोहयो अंतर्गत बांबूची लागवड रू. ८०००/- प्र. हेक्टर<br>अ. रोपवनाची,जुन्या बांबू बेटांची सुधारणा करणे रू.२०/- प्र.बांबू वेठ<br>प्रति हेक्टर रू.८०००/- मध्ये ४०० बांबू बेटे प्रति लाभार्थी जास्तीत जास्त २ हेक्टर = ८०० बांबू बेट | २०+२० हेक्टर<br>२०.०० हेक्टर | १.६०<br>१.६० |
| ५ | शेतकरी/उपक्रम परिचालक यांचे प्रशिक्षण (राज्यांतर्गत) तालुकास्तरावर एकूण२० प्रशिक्षणार्थी.प्रति प्रशिक्षण रू. १५२०/- प्रति प्रशिणार्थी,७दिन | १३ प्रशिक्षणे | ३.९५ |
| ६ | क्षेत्रीय कर्मचा-यांसाठी प्रशिक्षण रू.८०००/- प्रति प्रशिक्षणार्थी, ७ दिवसांकरीता एकूण २० प्रशिक्षणार्थी | १ | १ |
| ७ | रोपवन तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिक रू.१०,०००/-प्रति प्रात्यक्षिक | १० | १.०० |
| ८ | कार्यशाळा/चर्चासत्र/प्रशिक्षण जिल्हास्तर रू.१.०० लक्ष दोन दिवसांकरीता | १ | १.०० |
| ९ | रोपवनातील किड व रोप निवारणाचे व्यवस्थापन रू. २००/- प्रति हेक्टर (५० %) | २० हेक्टर | ०.४० |
| १० | लघुसिंचन सुविधा रू.२००००/- प्रति हेक्टर | २० हेक्टर | ४.०० |
|  | एकूण - | -- | ४३.७५ |

सहाय्यक संचालक, तथा
माहिती अधिकारी,
सामाजिक वनीकरण विभाग पुणे.